396

राजपत्रित अधिका-यांच्या प्रवास भत्त्याच्या देयकात तथा वैद्यकीय देयकांत आढळणा-या सर्वसामान्य उणिवा तथा चुकांचे निराकरण करणेबाबत.

CR1980010901

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग,
परिपत्रक क्रमांक टीआरडब्ल्यू-१३७९/२७०४/सीआर-९४३/७९/एडीएम-९,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ९ जानेवारी १९८०.

परिपत्रक

महालेखापाल, महाराष्ट्र १, मुंबई, ह्यांनी शासनाच्या असे निदर्शनास आणले आहे की, राजपत्रित अधिका-यांच्या प्रवास भत्ता तसेच वैद्यकीय देयकांच्या बाबतीत प्रामुख्याने पुढील त्रुटी सर्वसाधारणतः प्रामुख्याने आढळतात :-

अ) प्रवास भत्ता देयके

१) बेरजा बरोबर नसतात. गणिती चुका टाळणे आवश्यक आहे.
२) दैनिक भत्त्याची रक्कम चुकीच्या दराने काढण्यात येते.
३) प्रवासाचे उद्दिष्ट स्पष्ट करण्यात येत नाही.
४) कार्यालयीन ठाण्यापासून गैरहजेरीचे तास योग्य रीतीने मोजण्यात येत नाहीत.
५) वेतनाचा दर देयकात दाखविण्यात येत नाही.
६) आवश्यक तेव्हाही तिकिटांचा क्रमांक देण्यात येत नाही.
७) बदली प्रवास भत्ता देयकात किलोमिटर प्रमाणे दाखविण्यात येणारे अंतर बरोबर नसते.

ब) वैद्यकीय देयके

१) आवश्यकता प्रमाणपत्र 'A' बरोबर व पूर्णपणे भरण्यात येत नाही.

अ) वैद्यकीय उपचाराचा काल (Period of treatment).
आ) आजाराचे स्वरूप (Nature of ailment) आणि
इ) औषधांचे गट (Category of medicime)
इत्यादी प्रमाणपत्रातील स्तंभ भरलेले नसतात.

२) महाराष्ट्र नागरी सेवा (वैद्यकीय सेवा सवलती) नियम, १९६१ च्या नियम ८(४) प्रमाणे आवश्यक असणारी वैद्यकीय प्राधिका-याची पूर्वमान्यता ज्या ठिकाणी खाजगी डॉक्टर अथवा निष्णात ( Specialist ) किंवा विकृति शास्त्रज्ञांचा ( Pathologist ) सल्ला घेण्यात येतो अशा बाबतीत, रोख देयकाबरोबर सादर केलेली नसते.

३) कुटुंबातील व्यक्ती व त्यांचे नातेसंबंध ह्यांचा उल्लेख देयकात करण्यात येत नाही.

४) एकापेक्षा अधिक व्यक्तींसाठी खर्चाची परिपूर्तता करावयाची असली तरीही प्रत्येक व्यक्तीसाठी वेगळे प्रमाणपत्र आवश्यक असूनही फक्त एकच आवश्यकता प्रमाणपत्र देण्यात येते.

५) ज्यावेळी शासकीय सेवकाच्या माता-पित्यांसाठी केलेल्या खर्चाची प्रतिपूर्ती करावयाची असते, तेव्हा सदरहू व्यक्ती शासकीय सेवकांवर पूर्णपणे अवलंबून असल्याबद्दलचे व त्यांचे मासिक उत्पन्न दरमहा रु. २५०/- पेक्षा अधिक नसल्याचे प्रमाणपत्र आवश्यक असते, ते पण देण्यात येत नाही.

कृ. मा.प.

शामम-रोटा-विवि-एच-११६६(७०००+५-२-८०)

सर्व राजपत्रित अधिकाऱ्यांच्या लक्षात वरील त्रुटी संबंधित विभागीय व कार्यालयीन अधिकाऱ्यांनी आणाव्यात अशी विनंती शासनाकडून करण्यात येत आहे. तसेच नियंत्रक अधिकाऱ्यांनी ह्यापुढे अशा त्रुटी राहणार नाहीत याबद्दल नियंत्रक अधिकारी म्हणून देयकांवर प्रतिस्वाक्षरी करताना वरील बाबींचे पालन झाले आहे ह्या बद्दलही योग्य ती काळजी घेणे आवश्यक आहे ह्याकडेही सर्व विभागीय व कार्यालय प्रमुखांचे लक्ष वेधण्यात येत आहे.

२. महालेखापालांनी शासनाच्या असेही नजरेस आणले आहे की, नियंत्रक अधिकाऱ्यांनी मुंबई नागरी सेवा नियम ८०२ खालील टिप्पणीनुसार त्यांनी मंजूर केलेल्या प्रवास भत्ता देयकांसाठी एक नोंदवही ठेवावयाची असते परंतु ती नोंदवही बऱ्याचशा कार्यालयांतून ठेवली जात नाही. त्यामुळे प्रवास भत्ता देयकांवर योग्य ते नियंत्रण अशा अधिकाऱ्यांना ठेवता येत नाही. शासनाकडून सर्व कार्यालय व विभाग प्रमुखांना आदेश देण्यात येत आहेत की, सदरहू नोंदवही ठेवून त्यांचेकडे सादर होणाऱ्या राजपत्रित अधिकाऱ्यांच्या प्रवास भत्ता देयकावर प्रतिस्वाक्षरी करण्यापूर्वी देयक बरोबर असल्याबद्दल खात्री करून घेण्यासाठी आवश्यक ती उपाययोजना करावी.

३. राजपत्रित अधिकाऱ्यांना प्रवास भत्ता/रजा वेतन/वेतन अग्रीम मंजूर करण्यात येतात. परंतु, त्याची वसुली वेळेवर होत नाही असे आढळले आहे. कारण ज्यांना अग्रीम देण्यात येतात, ते राजपत्रित अधिकारी किंवा त्यांना अग्रीम मंजूर करणारे नियंत्रक अधिकारी त्यासाठी आवश्यक असणारी अग्रीम नोंदवही ठेवत नाहीत. अग्रीम देणारे अधिकारीही अग्रीम परत करण्यासाठी वैयक्तिक रीत्या जबाबदार असतातच. परंतु, ह्या बाबीकडे दुर्लक्ष होते व अग्रीम वेळेवर परत करण्यात येत नाहीत. शासनाकडून सर्व विभागीय व कार्यालय प्रमुखांना आदेश देण्यात येत आहे की, त्यांनी राजपत्रित अधिकाऱ्यांना देण्यात येणाऱ्या अग्रीमांच्या वसुलीसाठी योग्य ती नोंदवही ठेवणे आवश्यक आहे.

४. वरील सूचनांचे/आदेशांचे योग्य तऱ्हेने पालन होत आहे की नाही ह्यासाठी कार्यालयीन तपासणीचे वेळी विभाग/कार्यालय प्रमुखांनी खास नोंद व त्यांच्या तपासणी अहवालात घ्यावी. त्याचप्रमाणे अराजपत्रित कर्मचाऱ्यांच्या देयकांचे बाबतीतही वरील सूचनांचे पालन होणे आवश्यक आहे ही बाब त्यांनी लक्षात घ्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

बी. वि. देऊळकर,
सहाय्यक सचिव, वित्त विभाग.

जा.क्र.तरला-२८२/भूअभि-१९८२/अ-३१८०
पुणे दि. ३१ मार्च १९८०
प्रत-सर्व उपसंचालक भूमि अभिलेख यांना माहिती व मार्गदर्शनासाठी सस्नेह अग्रेषित.

नकाशा आयुक्त आणि संचालक,
भूमि अभिलेख (म. रा.), पुणे
यांचे करिता

का.अ.रे.१
K.W.P.C.

प्रत
मंत्रालयातील सर्व विभाग,
सर्व विभाग/कार्यालय प्रमुख,
*सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
*सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
*प्रबंधक, लोकायुक्त व उप लोकायुक्त यांचे कार्यालय,
*प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ न्याय शाखा, मुंबई,
*प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
महालेखापाल, महाराष्ट्र १, मुंबई,
महालेखापाल, महाराष्ट्र २, नागपूर,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.

*पत्राने.

एच-११६६(७०००+५-१-८०)अ.